
# महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,पुणे

द्वारा आयोजित

## राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा सन २०२१ - २२

नवोपक्रम गट क्र ५ अध्यापकाचार्य व पर्यवेक्षकीय अधिकारी गट

नवोपक्रम शीर्षक




**नवोपक्रम सादरकर्ता**

श्री. दादाराव भाऊराव मुसदवाले ( गटशिक्षणाधिकारी )

पंचायत समिती- देऊळगाव राजा, जिल्हा- बुलढाणा

**मार्गदर्शक**

श्री. सचिन जगताप, शिक्षणाधिकारी ( प्राथमिक )

जिल्हा परिषद - बुलढाणा

श्री. श्रीकृष्ण इंगळे, गट विकास अधिकारी

पंचायत समिती- देऊळगाव राजा

## नवोपक्रम सादरकर्त्याचा परिचय

१] नवोपक्रमाचे शीर्षक- " फळा तिथे शाळा "

२] नवोपक्रम कर्त्याचे नाव- श्री. दादाराव भाऊराव मुसदवाले

३] पद - गटशिक्षणाधिकारी

४] संस्थेचे नाव व पत्ता udise/icds सह- पंचायत समिती- देऊळगाव राजा,

जिल्हा- बुलढाणा पिन ४४३२०४

५] नवोपक्रम गट क्र - ५

६] नवोपक्रम गटाचे नाव - अध्यापकाचार्य व पर्यवेक्षकीय अधिकारी गट

७] कायमचा पत्ता- व्यंकटेश नगर, देऊळगाव राजा, जिल्हा- बुलढाणा पिन- ४४३२०४

८] शैक्षणिक अर्हता [ शिक्षण ]- MA English, Bed

९] नोकरीत / खात्यात रुजू दिनांक - २५- ०८- २००६

१०] गटशिक्षणाधिकारी पदाचा अनुभव - ७ वर्ष

११] मोबाईल क्रमांक [ whtasapp ] ९७६७९२२००३

१२] ईमेल आय डी- musadwaledadarao@gmail.com

१३] नवोपक्रम योजलेला कालावधी - जून २०२१ ते ऑक्टोबर २०२१

# अनुक्रमणिका


| अ क्र | तपशील | पृष्ट क्र |
|---|---|---|
| १ | मुखपृष्ट | १ |
| २ | नवोपक्रम सादरकर्त्याचा परिचय | २ |
| ३ | अनुक्रमणिका | ३ |
| ४ | नवोपक्रमाचे शीर्षक | ४ |
| ५ | नवोपक्रमाची गरज व महत्व | ५ |
| ६ | नवोपक्रमाची उद्दिष्टे | ९ |
| ७ | नवोपक्रमाचे नियोजन | १० |
| ८ | नवोपक्रमाची कार्यपद्धती | १५ |
| ९ | नवोपक्रमाची यशस्वीता / फलनिष्पत्ती | २५ |
| १० | समारोप | २६ |
| ११ | संदर्भसूची व परिशिष्टे : संदर्भसूची | २७ |
| | : परिशिष्टे | २८ |

## (१) नवोपक्रमाचे शीर्षक :-

"फळा तिथे शाळा"



## (२) नवोपक्रमाची गरज व महत्व :-

माझ्या पंचायत समितीमध्ये जिल्हा परिषदेच्या एकूण ७१ प्राथमिक शाळा आहेत. covid-१९ च्या कारणाने शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये पूर्णपणे शाळा बंद होत्या. शासनाच्या निर्देशाप्रमाणे तसेच स्थानिक स्तरावर शिक्षक व शाळांच्या प्रयत्नातून ऑनलाईन माध्यमातून तसेच विविध प्रकारची साधने जसे मोबाईल, टीव्ही याद्वारे शिक्षण सुरु ठेवण्याचा भरपूर प्रयत्न केला गेला. सुरुवातीला मोबाईल उपलब्ध असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या ३५ ते ४० टक्के पर्यंत होती परंतु जसजसे ऑनलाईन शिक्षण सुरू झाले तसतसे शिक्षणासाठी मोबाईल वापरणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या २० टक्के पर्यंत असल्याची वस्तुस्थिती समोर आली. आणि ही बाब समाधान देणारी नव्हती. त्यामुळे covid-१९ च्या काळात ऑनलाइन शिक्षण देण्यासाठी वापरात असणारी माध्यमे जसे दीक्षा ॲप, स्वाध्यायमाला, गुगल मीट, झूम, व्हाट्सएप, इंस्टाग्राम, टीचमिंट या साधनांचा वापर होत होता. परंतु लाभार्थी संख्या मात्र २० टक्केच्या आसपासच होती जवळ जवळ ८० टक्के विद्यार्थी शिक्षणापासून वंचित होते. विशेषता या वर्षी इयत्ता पहिली मध्ये दाखल विद्यार्थ्यांची परिस्थिती फारच बिकट होती. कारण हे विद्यार्थी शाळेच्या व शिक्षकांच्या संपर्कात नव्हतीच.

काही शाळांमध्ये शिक्षकांच्या गृहभेटी, स्वयंअध्ययन, स्वयंसेवकांची नेमणूक असे काही प्रयत्न केले परंतु त्याचा पाहिजे तसा परीणाम दिसून आला नाही. तसेच यावर्षी सन २०२१-२०२२ मध्ये जून २०२१ पासून सुद्धा कोविड मुळे शाळा बंदच होत्या. यावर्षी सुद्धा गतवर्षीप्रमाणे विद्यार्थी शिक्षणापासून दूर जाण्याची भीती होती.

कोविड-१९ च्या सर्वेक्षाणानिमित्त मे २०२१ ते जून २०२१ च्या काळात गावात भेटी देत असतांना काही विद्यार्थ्यांशी संवाद साधला असता विद्यार्थ्यांना आपल्या शाळेचे पूर्ण नाव, स्वतःचा वर्ग व वर्गशिक्षक कोण ? हे सुद्धा सांगता आले नाही. म्हणजेच विद्यार्थी स्वतःची शाळा, वर्ग व वर्गशिक्षक सुद्धा विसरले. त्यामुळे विद्यार्थी पुन्हा शाळेकडे व शिक्षणाकडे आकर्षित व्हावे म्हणून काहीतरी नवीन उपक्रम करावा या दृष्टीकोनातून विचार करत होतो. तसेच कोविड ची तिसरी लाट येण्याची भीती आणि लहान मुलांवर त्याचे होणारे दुष्परिणाम या सर्व गोष्टींचा विचार करून विद्यार्थी व शिक्षकांची सुरक्षितता लक्षात घेवून तालुक्यातील विद्यार्थ्यांसाठी एखादा चांगला उपक्रम सुरु करावा असे मनाशी पक्के केल्यानंतर अनेक उपक्रम डोळ्यासमोर आले.

एकदा एके ठिकाणी न्याय व्यवस्थेसंबधी एक वाक्य वाचनात आले होते *“Where the Judge sits, The Court stands there.”* या वाक्यावरून चटकन एक उपक्रम सुचला *“Where the Teacher stands, The Class starts there.”* म्हणजेच “जिथे शिक्षक उभा राहील, तिथे वर्ग सुरु.” यावरून “फळा तिथे शाळा” या उपक्रमाची निर्मिती झाली.

या उपक्रमा अंतर्गत शिक्षकांना शिकवण्यासाठी एखादे साधन लागेल त्यासाठी उपयुक्त असा फळा आणि खडू होय. पण फळे तर शाळेत वर्गात आहेत आणि शाळा कोविड मुळे बंद आहे म्हणून वर्गातील निघू शकतील असे फळे काढून प्रत्येक शिक्षकांनी

आपला फळा गावात जिथे सुरक्षित व सोयीचे जागा असेल म्हणजे मंदिर, मस्जिद, चर्च, समाज मंदिर, सभागृह, एखाद्या व्यक्तीचा वाडा, घराचा व्हरांडा, ओटा किंवा गर्द सावलीचे झाड अशा ठिकाणी आपला फळा लावायचा त्या सगळ्याची जबाबदारी नजीकच्या एखाद्या विद्यार्थ्याला द्यायची आणि त्याच्या आसपासच्या गल्लीतील विद्यार्थ्यांना निश्चित वेळ देऊन बोलवायचे आणि कोविड च्या सर्व नियमांचे पालन करून विद्यार्थ्यांना रोज दोन ते तीन तास शिकवायचे, त्यांचा अभ्यास घ्यायचा असे या उपक्रमाचे स्वरूप आहे.

माझ्या पंचायत समितीतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून व विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहात टिकून राहावे म्हणून सदर उपक्रम योजलेला आहे.

## उपक्रमाचे वेगळेपण :-

असा उपक्रम याअगोदर कुणी पंचायत समितीत स्तरावर राबवल्याचे माझ्या वाचनात आलेले नाही प्रस्तुत उपक्रम पूर्णता माझी म्हणजेच नवोपक्रम कर्त्याची संकल्पना आहे “फळा तिथे शाळा” या उपक्रमा अंतर्गत शिक्षक, केंद्रप्रमुख, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, सरपंच, ग्रामसेवक व पालक यांची भूमिका सुद्धा खूप महत्त्वाची ठरलेली आहे. हा उपक्रम स्थळसापेक्ष, काळसापेक्ष व व्यक्तिसापेक्ष पूर्णतः नवीन आणि वेगळा आहे.

## उपक्रमाची उपयुक्तता :-

कोरोना काळात (१) शाळा बंद असल्याने आणि बऱ्याच पालकांकडे मोबाईल नसल्याने सुमारे ८० टक्के विद्यार्थी शिक्षणापासून वंचित रहायला नकोत (२) इयत्ता पहिलीत गतवर्षी आणि या वर्षी नव्याने दाखल झालेले विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहात राहावेत व (३) विद्यार्थ्यांना किमान मुळाक्षरांचे ज्ञान, अंकज्ञान होऊन लेखन व वाचन करता यावे. म्हणून सदर नवोपक्रम पंचायत समितीतील सर्व शाळांतील विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त आहे.

## (३) नवोपक्रमाची उद्दिष्टे :-

फळा तिथे शाळा - हा नवोपक्रम पुढील उद्दिष्टांवर आधारलेला आहे.

१ ) शाळेपासून दुरावलेले विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहात आणणे.

२ ) प्रत्येक गावांमध्ये सकारात्मक शैक्षणिक वातावरण निर्माण करणे.

३ ) गावकऱ्यांचा शैक्षणिक सहभाग वाढवणे.

४ ) विद्यार्थ्यांचा पुन्हा अभ्यासाकडे कल वाढवणे.

५ ) विद्यार्थ्यांना स्वयं अध्ययनाची सवय लावणे.

६ ) इयत्ता पहिली आणि दुसरीतील विद्यार्थ्यांना लेखन वाचन करता येणे.

७ ) कोविडच्या परिस्थितीतही विद्यार्थी शिकू शकतो असा आत्मविश्वास शिक्षकांमध्ये निर्माण करणे.

८ ) मोबाईल इंटरनेट शिवाय विद्यार्थ्यांना ऑफलाइन शिक्षण देणे.

९) विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानाची पालकांमधील भीती नाहीशी करणे.

## (४) नवोपक्रमाचे नियोजन :-

उपक्रमपूर्व स्थितिचे निरीक्षण :-

उपक्रम सुरु होण्याअगोदर कोविड १९ कोरोनायुक्त परिस्थिती होती. शाळा बंद होत्या. मागील वर्षी इयत्ता पहिली दाखल झालेले विद्यार्थी यावर्षी इयत्ता दुसरीत प्रवेशित झाले आहेत परंतु प्रत्यक्ष शिक्षक १००% विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचून विद्यार्थ्यांना मुळाक्षरांचे ज्ञान, संख्यावाचन, मराठी विषयातील लेखन वाचन करून घेण्यासंदर्भात अपयशी ठरले. गंभीर बाब म्हणजे काही पालकांशी संवाद साधत असताना पालकांची अशी तक्रार होती की शाळा बंद असल्याने गावातील विद्यार्थी तंबाखू- गुटका यासारखी व्यसने करत आहेत ही बाब अतिशय चिंताजनक होती. ज्या विद्यार्थ्यांकडे मोबाईल नाहीत म्हणजेच जे विद्यार्थी ऑनलाईन शिक्षण घेत नाहीत असे बरेच विद्यार्थी गावामध्ये फक्त वेगवेगळ्या प्रकारचे खेळ खेळताना, उनाडपणा करतांना आढळून येत होते. उपक्रमाच्या सुरुवातीला पूर्व चाचणी घेतली असता त्या चाचणीमध्ये विद्यार्थ्यांचे संख्याज्ञान अक्षर ओळख मराठीतील लेखन वाचन ह्या प्राथमिक बाबीसुद्धा विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारे करता येत नसल्याचे दिसून आले.

### संबधित व्यक्तिशी , तज्ञांशी चर्चा :-

पंचायत समिती देऊळगाव राजा मधील विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहात रहावेत म्हणून योजावयाच्या “फळा तिथे शाळा” या उपक्रमासंदर्भात अगदी सुरुवातीला या मतदार संघाचे आमदार तथा बुलढाणा जिल्ह्याचे पालकमंत्री माननीय डॉ. राजेंद्रजी शिंगणे साहेब व मा शिक्षणाधिकारी सचिन जगताप साहेब यांच्यासोबत चर्चा केली. नंतर गटविकास

अधिकारी श्रीकृष्ण इंगळे साहेब, सभापती पंचायत समिती देऊळगाव राजा श्री हरिभाऊ शेटे, पंचायत समिती देऊळगाव  राजा मधील केंद्रप्रमुख श्री अशोक झिने- केंद्र भिवगाव, श्री विनोद सोनुने- केंद्र असोला, श्री बी डब्ल्यू कुमठे- केंद्र मेहुणा राजा, श्री डी एम बुरकूल- केंद्र देऊळगाव मही, इब्राहिम पठाण- केंद्र सरंबा, श्री मुळे सर- केंद्र अंढेरा यांच्यासोबत चर्चा केली आणि चर्चेअंती सर्वांचा सकारात्मक प्रतिसाद मिळाला.

## आवश्यक साधनांचा विचार :-

कोरोना काळात शिक्षकांना व विद्यार्थ्यांना स्वत:च्या संरक्षणासाठी मास्क , sanitizer ची व्यवस्था केली. प्रस्तुत उपक्रमा साठी आवश्यक असलेल्या भौतिक आणि मूल्यमापनाच्या साधनांचे नियोजन केले. शाळेच्या शिक्षकांद्वारे काही विद्यार्थ्यांना पेन, वही, पेन्सिल देण्याचे नियोजन केले. त्याच सोबत विद्यार्थ्यांची घ्यावयाची पूर्व चाचणी व उत्तर चाचणी चे विकसन करण्याचे नियोजन केले.

## करावयाच्या कृतींचा क्रम :-

कोविड १९ चा सर्वे करत असताना पालक व विद्यार्थ्यांची संवाद साधने- शैक्षणिक परिस्थितीची सद्यस्थिती जाणून घेणे- बुलढाणा जिल्ह्याचे पालकमंत्री माननीय डॉ. राजेंद्रजी शिंगणे साहेब आणि शिक्षणाधिकारी श्री सचिन जगताप साहेब यांच्यासोबत चर्चा करणे- सर्व मुख्याध्यापक यांची गुगल मीटवर सभा घेणे- सर्व केंद्रप्रमुख यांची कोविड नियमांचे पालन करत प्रत्यक्ष सभा घेणे- पंचायत समितीचे गट विकास अधिकारी पंचायत समितीचे सभापती यांच्यासोबत चर्चा करणे- प्रायोगिक तत्त्वावर जिल्हा परिषद

शाळा पांगरी, सावखेड भोई आणि सावखेड नागरे येथे “फळा तिथे शाळा” उपक्रम सुरु करणे- या उपक्रमाचा प्रतिसाद पाहणे- पंचायत समिती देऊळगाव राजा अंतर्गत जिल्हा परिषदेतील सर्व शिक्षकांची कोविड नियमांचे पालन करत माननीय गटविकास अधिकारी श्री. श्रीकृष्ण इंगळे साहेबांचे मार्गदर्शनाखाली दोन दिवसात प्रत्येकी ३ केंद्रांच्या सभा घेणे- केंद्र भिवगाव, आसोला व मेहुणा राजा.- दुसऱ्या दिवशी माननीय गटविकास अधिकारी श्री. श्रीकृष्ण इंगळे साहेबांचे मार्गदर्शनाखाली सहभाग घेणे केंद्र देऊळगाव मही, सरंबा व अंढेरा.- प्रत्यक्ष संपूर्ण तालुक्यात उपक्रमासाठी चे नियोजन करणे, स्थळ निश्चिती करणे- पूर्व चाचणी घेणे व  पंचायत समिती देऊळगाव राजा अंतर्गत जिल्हा परिषदेच्या सर्व शाळांमध्ये “फळा तिथे शाळा” हा उपक्रम सुरू करणे- उत्तर चाचणी घेणे- पूर्व व उत्तर चाचणीचे विश्लेषण करणे

## उपक्रमोत्तर स्थितीचे निरीक्षण :-

पंचायत समिती देऊळगाव राजा अंतर्गत जिल्हा परिषदेच्या सर्व शाळांमधील “फळा तिथे शाळा” उपक्रमामध्ये ऑक्टोबर २०२१ महिन्यात उत्तर चाचणी घेवून पूर्व व उत्तर चाचणीचे विश्लेषण करण्याचे नियोजन केले आहे. जर प्रत्यक्ष शाळा सुरु झाल्याच नाही तर सर्व विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम चालूच राहणार आहे. आणि ज्या विद्यार्थ्यांना उत्तरचाचणीत कमी गुण मिळालेत अशांसाठी विशेष उपचारात्मक अध्यापन करण्याचे नियोजन केले आहे

कार्यवाहीचे टप्पे :-

कोविड काळात शाळा बंद असतांना “फळा तिथे शाळा” हा उपक्रम योजलेले आहे आणि या नवोपक्रमाच्या कर्यवाहीचे टप्पे पुढील प्रमाणे आहेत. तसेच या नवोपक्रमाचा कालावधी जून २०२१ ते ऑक्टोबर २०२१ आहे.

| अक्र | विवरण | कालावधी |
|---|---|---|
| १ | कोविड १९ चा सर्वे करत असताना पालक व विद्‌यार्थ्यांची संवाद साधने- शैक्षणिक परिस्थितीची सद्‌यस्थिती जाणून घेणे | १ जून २०२१ ते २० जून २०२१ |
| २ | बुलढाणा जिल्ह्याचे पालकमंत्री माननीय डॉ. राजेंद्रजी शिंगणे साहेब आणि शिक्षणाधिकारी श्री सचिन जगताप साहेब यांच्यासोबत चर्चा करणे | २१ जून २०२१ |
| ३ | सर्व मुख्याध्यापक यांची गुगल मीटवर सभा घेणे | २५ जून २०२१ |
| ४ | सर्व केंद्रप्रमुख यांची कोविड नियमांचे पालन करत प्रत्यक्ष सभा घेणे | ३० जून २०२१ |
| ५ | पंचायत समितीचे गट विकास अधिकारी पंचायत समितीचे सभापती यांच्यासोबत चर्चा करणे | ३० जून २०२१ |
| ६ | प्रायोगिक तत्त्वावर पांगरी सावखेड भोई सावखेड नागरे येथे “फळा तिथे शाळा” उपक्रम सुरु करणे | १ जुलै २०२१ ते १५ जुलै २०२१ |
| ७ | या उपक्रमाचा प्रतिसाद पाहणे | १५ जुलै २०२१ |
| ८ | पंचायत समिती देऊळगाव राजा अंतर्गत जिल्हा परिषदेतील सर्व शिक्षकांची कोविड नियमांचे पालन करत माननीय गटविकास अधिकारी श्री. श्रीकृष्ण इंगळे साहेबांचे मार्गदर्शनाखाली सभा घेणे- केंद्र भिवगाव, आसोला व मेहुणा राजा. | १६ जुलै २०२१ |
| ९ | माननीय गटविकास अधिकारी श्री. श्रीकृष्ण इंगळे साहेबांचे मार्गदर्शनाखाली सभा घेणे- केंद्र देऊळगाव मही, सरंबा व अंढेरा. | १७ जुलै २०२१ |

| | | |
|---|---|---|
| १० | प्रत्यक्ष संपूर्ण तालुक्यात उपक्रमासाठी चे नियोजन करणे, स्थळ निश्चिती करणे- पूर्व चाचणी घेणे व पंचायत समिती देऊळगाव राजा अंतर्गत जिल्हा परिषदेच्या सर्व शाळांमध्ये "फळा तिथे शाळा" हा उपक्रम सुरू करणे | १८ जुलै २०२१ ते २७ ऑक्टोबर २०२१ |
| ११ | उत्तर चाचणी घेणे | २७ ऑक्टोबर २०२१ |
| १२ | पूर्व व उत्तर चाचणीचे विश्लेषण करणे | ३० ऑक्टोबर २०२१ |

## उपक्रमासाठी इतरांची मदत :-

उपक्रमासंदर्भात बुलढाणा जिल्ह्याचे पालकमंत्री माननीय डॉ. राजेंद्रजी शिंगणे साहेब व मा शिक्षणाधिकारी सचिन जगताप साहेब यांची बहु मोलाची मदत झाली. गटविकास अधिकारी श्रीकृष्ण इंगळे साहेब, सभापती पंचायत समिती देऊळगाव राजा श्री हरिभाऊ शेटे, पंचायत समिती देऊळगाव राजा मधील केंद्रप्रमुख श्री अशोक झिने, श्री विनोद सोनुने, श्री बी डब्ल्यू कुमठे, श्री डी एम बुरकूल, इब्राहिम पठाण, श्री मुळे सर, पालक, पंचायत समितीतील सर्व शिक्षक व शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, गावातील मंदिर, मस्जीत, चर्च चे ट्रस्टी, पालक व सर्व शिक्षकांचे सहकार्य लाभले.

## उपक्रमासाठी सादर करावयाचे पुरावे :-

प्रस्तुत उपक्रमासाठी तालुक्याचा एकत्रित पूर्व व उत्तर चाचणी निकाल यांचे शेकडा प्रमाण व त्यातील फरकावरून उपक्रमाची यशस्विता मांडण्याचे ठरविले आहे. सोबतच उपक्रमात सक्रीय सहभागी शिक्षक- विद्यार्थ्यांचे फोटो, व्हीडीओ सादर करण्याचे ठरविले आहे.

## (५) नवोपक्रमाची कार्यपद्धती :-

सन २०२१-२२ मध्ये पंचायत समिती देऊळगाव राजा अंतर्गत एकूण ७२ शाळांतील इयत्ता १ ली ते ८ वीत दाखल विद्यार्थ्यांची संख्या खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र | केंद्र | इयत्ता १ | इयत्ता २ | इयत्ता ३ | इयत्ता ४ | इयत्ता ५ | इयत्ता ६ | इयत्ता ७ | इयत्ता ८ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मेहुणा राजा | १८७ | २२९ | २७४ | २५३ | १६९ | १५१ | १३३ | ३१ | १४२७ |
| २ | देऊळगाव मही | ३१८ | २३५ | २६९ | २५० | १४४ | ११३ | ११८ | ४२ | १४८९ |
| ३ | असोला जहागिर | १७५ | ९९ | १४५ | १६० | ८१ | ६९ | ६९ | २८ | ८२६ |
| ४ | सरंबा | १६२ | १४१ | १५४ | १४२ | ९१ | १०६ | ८८ | ७४ | ९३२ |
| ५ | अंढेरा | १७८ | १७५ | १८६ | २१७ | ० | ० | ० | ० | ७५६ |
| ६ | भिवगाव | २२५ | १७७ | २०१ | १९२ | १२१ | १२९ | ११८ | १०९ | १२७२ |
| | एकूण | १२४५ | १०५६ | १२२९ | १२१४ | ६०६ | ५६८ | ५२६ | २८४ | ६७०२ |

अ ) पूर्व स्थितीची निरिक्षणे व त्यांच्या नोंदी :-

"फळा तिथे शाळा" हा उपक्रम सुरु होण्या अगोदरची स्थिती खालीलप्रमाणे

| अ.क्र | इयत्ता | विद्यार्थी संख्या | online अभ्यास करणारे विद्यार्थी | offline अभ्यास करणारे विद्यार्थी |
|---|---|---|---|---|
| १ | इयत्ता १ ते ८ एकूण | ६७०२ | १३३४ | ० |
| २ | इयत्ता १ ली | १२४५ | २३७ | ० |
| ३ | इयत्ता २ री | १०५६ | १७४ | ० |

गतवर्षी इयत्ता पहिलीत दाखल झालेले विद्यार्थी यावर्षी इयत्ता दुसरीत आहेत मात्र त्यांचा कोविड १९ मुळे शाळा बंद असल्याने शिक्षकांसोबत संपर्क झाला नाही. आणि यावर्षी पहिलीत दाखल झालेल्या विद्यार्थ्यांची परिस्थिती सुद्धा तशीच

आहे. या विद्यार्थ्यांनी शाळा व शिक्षक पाहिलेले नसल्याने आणि या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये म्हणून “फळा तिथे शाळा” या उपक्रमाअंतर्गत इयत्ता १ ली व २ री च्या विद्यार्थ्यांवर जास्तीत जास्त लक्ष केंद्रित केलेले आहे.

इयत्ता १ ली च्या विद्यार्थ्यांची दिनांक १८ जुलै २०२१ रोजी पूर्व चाचणी घेतली त्यावेळी खालील प्रमाणे माहिती निदर्शनास आली

| अ. क्र | केंद्र | इयत्ता १ ली | पूर्व चाचणी मध्ये मिळालेले एकूण गुण | पूर्व चाचणी मध्ये मिळालेल्या गुणांचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | मेहुणा राजा | १८७ | २१६ | ५.७७ |
| २ | देऊळगाव मही | ३१८ | ४१२ | ६.४७ |
| ३ | असोला जहागिर | १७५ | २१८ | ६.२२ |
| ४ | सरंबा | १६२ | १९८ | ६.११ |
| ५ | अंढेरा | १७८ | २१६ | ६.०६ |
| ६ | भिवगाव | २२५ | ३५७ | ७.९३ |
| | एकूण | १२४५ | १६१७ | ६.४९ |

इयत्ता २ री च्या विद्यार्थ्यांची दिनांक १८ जुलै २०२१ रोजी पूर्व चाचणी घेतली त्यावेळी खालील प्रमाणे माहिती निदर्शनास आली

| अ. क्र | केंद्र | इयत्ता २ री | पूर्व चाचणी मध्ये मिळालेले एकूण गुण | पूर्व चाचणी मध्ये मिळालेल्या गुणांचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | मेहुणा राजा | २२९ | ४२७ | ९.३२ |
| २ | देऊळगाव मही | २३५ | ४९६ | १०.५५ |
| ३ | असोला जहागिर | ९९ | २११ | १०.६५ |
| ४ | सरंबा | १४१ | २३६ | ८.३६ |
| ५ | अंढेरा | १७५ | २८४ | ८.११ |
| ६ | भिवगाव | १७७ | २६८ | ७.५७ |
| | एकूण | १०५६ | १९२२ | ९.१० |

पूर्वचाचणी वरून जी माहिती मिळाली त्यामध्ये चित्र ओळखून चित्राच्या नावाची जोडी जुळवणे, दिलेल्या मुळाक्षरा सारख्या मूळाक्षराला गोल करणे, चित्रातील वस्तू मोजून समोरील संख्येची जोडी जुळवणे, दिलेल्या संख्येच्या नावासमोर संख्या अंकात लिहिणे, संख्यांच्या रिकाम्या चौकटी पूर्ण करणे ह्या बाबी विद्यार्थ्यांना करता आलेल्या नाही म्हणून यावरून असे कळते की, इयत्ता पहिली व दुसरीतील विद्यार्थ्यांना मुळाक्षरांची ओळख अंकांची ओळख मुळाक्षरे व अंक वाचन व लेखन पुरेपूर करता येत नाही म्हणून इयत्ता पहिली व दुसरीच्या विद्यार्थ्यावर जास्तीत जास्त लक्ष केंद्रित करण्या संदर्भात शिक्षकांना सूचित केले.

मागील वर्षी इयत्ता पहिलीत असलेले विद्यार्थी सध्या दुसऱ्या वर्गात प्रवेशीत झाले परंतु प्रत्यक्ष शिक्षण मात्र त्यांच्यापर्यंत पोहोचले नव्हते म्हणून इयत्ता पहिली व दुसरीच्या विद्यार्थ्यावर जास्तीत जास्त लक्ष केंद्रित करण्यात आले आहे या विद्यार्थ्यांकडून मुळाक्षरांची ओळख, संख्या ओळख, अक्षर व अंक वाचन व लेखन या क्रिया करून घेण्यावर जास्तीत जास्त भर देण्यात आला व त्याचे सकारात्मक परिणाम कार्यवाही मध्ये दिसून आला.

### ब ) कार्यवाही दरम्यान निरीक्षने व माहिती संकलन :-

दिनांक १८ जुलै ते २७ ऑक्टोबर दरम्यान पंचायत समिती देऊळगाव राजा अंतर्गत जिल्हा परिषदेच्या सर्व शाळांमध्ये फळा तिथे शाळा हा उपक्रम सुरू होता. या उपक्रमा दरम्यान विद्यार्थ्यांना दररोज ऑफलाइन शिक्षण घेण्यासाठी निश्चित केलेल्या ठिकाणी निश्चित वेळेवर उपस्थित राहण्यासाठी प्रवृत्त केले. सॅनिटायझर, मास्क कसे वापरावे याबद्दल माहिती दिली आणि नियमित हा उपक्रम सुरू ठेवला. या उपक्रमामध्ये इयत्ता पहिली व दुसरीच्या मुलांसाठी विशेष करून मराठी मुळाक्षरांची ओळख, गणितातील अंकांची ओळख, मुळाक्षरांचे वाचन व अंकांचे वाचन व लेखन या क्रियांवर जास्तीत जास्त भर देण्यात आला. हा उपक्रम सुरू असताना शासन निर्देशानुसार ग्रामीण भागातील इयत्ता पाचवी ते आठवीचे वर्ग ४ ऑक्टोबर पासून कोविड नियमांचे पालन करत सुरू झाले. परंतु इयत्ता पहिली ते चौथीचे वर्ग अद्याप सुरू झाले नसल्याने या वर्गातील विद्यार्थ्यांना

ऑफलाइन मोड मध्ये "फळा तिथे शाळा" या उपक्रमाचा लाभ देणे सुरूच ठेवले. त्यामध्ये सुद्धा इयत्ता पहिली व दुसरी या विद्यार्थ्यांवर विशेष लक्ष दिले गेले.





**उपक्रमामध्ये सहभागी विद्यार्थी व शिक्षक**





देऊळगाव राजा पंचायत समिती अंतर्गत जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये सुरु असलेल्या

"फळा तिथे शाळा" या उपक्रमा संदर्भातील video ची लिंक

https://youtu.be/L6c4DFtnEzA









## क ) उपक्रम पूर्ण झाल्यावर निरीक्षने व त्याच्या नोंदी :-

“फळा तिथे शाळा” हा उपक्रम सुरु झाल्यावरची स्थिती खालीलप्रमाणे

| अ.क्र | इयत्ता | विद्यार्थी संख्या | online अभ्यास करणारे विद्यार्थी | offline अभ्यास करणारे विद्यार्थी |
|---|---|---|---|---|
| १ | इयत्ता १ ते ८ एकून | ६७०२ | ० | ६७०२ |
| २ | इयत्ता १ ली | १२४५ | ० | १२४५ |
| ३ | इयत्ता २ री | १०५६ | ० | १०५६ |

इयत्ता १ ली च्या विद्यार्थ्यांची दिनांक २७ ऑक्टोबर २०२१ रोजी उत्तर चाचणी घेतली त्यावेळी खालील प्रमाणे माहिती निदर्शनास आली.

| अ. क्र | केंद्र | इयत्ता १ ली | उत्तर चाचणी मध्ये मिळालेले एकूण गुण | उत्तर चाचणी मध्ये मिळालेल्या गुणांचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | मेहुणा राजा | १८७ | २२८० | ६०.९६ |
| २ | देऊळगाव मही | ३१८ | २७७५ | ४३.६३ |
| ३ | असोला जहागिर | १७५ | २३५२ | ६७.२० |
| ४ | सरंबा | १६२ | २४६६ | ७६.११ |
| ५ | अंढेरा | १७८ | २७५१ | ७७.२७ |
| ६ | भिवगाव | २२५ | २३८६ | ५३.०२ |
| | एकूण | १२४५ | १५०१० | ६०.२८ |

इयत्ता २ री च्या विद्यार्थ्यांची दिनांक २७ ऑक्टोबर २०२१ रोजी उत्तर चाचणी घेतली त्यावेळी खालील प्रमाणे माहिती निदर्शनास आली.

| अ. क्र | केंद्र | इयत्ता २ री | उत्तर चाचणी मध्ये मिळालेले एकूण गुण | उत्तर चाचणी मध्ये मिळालेल्या गुणांचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | मेहुणा राजा | २२९ | २९१० | ६३.५३ |
| २ | देऊळगाव मही | २३५ | १८३० | ३८.९३ |
| ३ | असोला जहागिर | ९९ | १६९४ | ८५.५५ |
| ४ | सरंबा | १४१ | २०४९ | ७२.६५ |
| ५ | अंढेरा | १७५ | २५५१ | ७२.८८ |
| ६ | भिवगाव | १७७ | २२७६ | ६४.२९ |
| | एकूण | १०५६ | १३३१० | ६३.०२ |

उत्तरचाचणी वरून जी माहिती मिळाली त्यामध्ये चित्र ओळखून चित्राच्या नावाची जोडी जुळवणे, दिलेल्या मुळाक्षरा सारख्या मूळाक्षराला गोल करणे, चित्रातील वस्तू मोजून समोरील संख्येची जोडी जुळवणे, दिलेल्या संख्येच्या नावासमोर संख्या अंकात लिहिणे, संख्यांच्या रिकाम्या चौकटी पूर्ण करणे ह्या बाबी विद्यार्थ्यांना करता आल्या. इयत्ता पहिली व दुसरीच्या विद्यार्थ्यांवर जास्तीत जास्त लक्ष केंद्रित केल्यामुळे या विद्यार्थ्यांना मुळाक्षरांची ओळख, संख्या ओळख, अक्षर व अंक वाचन व लेखन या क्रिया करता आल्या व त्याचे सकारात्मक परिणाम उत्तरचाचणी मध्ये दिसून आले.

विशेष म्हणजे “फळा तिथे शाळा” हा उपक्रम सुरु असतांना इयत्ता पहिली ते आठवी च्या एकाही विद्यार्थ्याला कोविड १९ ची बाधा झाली नाही.

## ड ) कार्यवाहीत आलेल्या अडचणी :-

उपक्रम राबवत असतांना काही अडचणी आल्या व त्या सोडवण्यात यश आले.

१) अडचण :- हा उपक्रम सुरू करण्यापूर्वी फळ्याची ठिकाणं निश्चित करताना मंदिरे सभागृह मिळविण्यात अडचणी निर्माण झाल्या.

उपाय :- ज्या ठिकाणी अशा अडचणी निर्माण झाल्या त्या ठिकाणी जाऊन तेथील मंदिर व्यवस्थापन व गावातील प्रतिष्ठित लोकांशी संपर्क करून मंदिरा ची व सभागृहाची जागा सदर उपक्रमासाठी उपलब्ध करून घेतली.

२) अडचण :- काही पालकांनी फळा तिथे शाळा या उपक्रमात ऐवजी शाळाच सुरू करण्यात याव्यात असा आग्रह धरला.

उपाय :- याबाबत अशा पालकांशी चर्चा करून शासनाच्या निर्देशाप्रमाणे असे सध्या तरी करता येणार नाही ही बाब त्यांना पटवून दिली.

३) अडचण :- अनेक ठिकाणी विद्‍यार्थ्यांना मास्क नव्हते

उपाय :- अशा विद्‍यार्थ्यांना स्वतःच्या खर्चातून तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी त्यांच्या सहकार्यातून मास्क उपलब्ध करून देण्यात आले व विद्‍यार्थ्यांना मास्क वापरण्याचे महत्त्व समजावून सांगितले.


४) अडचण :- विद्‍यार्थी एकत्र बोलण्या बाबत काही शिक्षकांमध्ये संभ्रम होते

उपाय :- अशा शिक्षकांच्या केंद्रस्तरीय सभा घेऊन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या व त्याबाबत मार्गदर्शन करून या उपक्रमासाठी त्यांची मानसिक तयारी करून घेतली.


## इ ) माहितीचे विश्लेषन : आलेख व तक्ते :-

पूर्व चाचणी व उत्तर चाचणी विश्लेषण :- एकूण ६ प्रश्न. एकूण २० गुण


- इयत्ता पहिलीतील विद्यार्थ्यांची पूर्व चाचणी घेतली असता या चाचणीत विद्यार्थ्यांना मिळालेले एकूण गुण १६१७ आणि त्याचे शेकडा प्रमाण = ६.४९ %
- याच विद्यार्थ्यांची उत्तर चाचणी घेतली असता या चाचणीत विद्यार्थ्यांना मिळालेले एकूण गुण १५०१० आणि त्याचे शेकडा प्रमाण = ६०.२८ %
- इयत्ता पहिली पूर्व चाचणी व उत्तर चाचणीतील शेकडा प्रमाणाचा फरक = ५३.७९ %
- तसेच इयत्ता दुसरीतील विद्यार्थ्यांची पूर्व चाचणी घेतली असता या चाचणीत विद्यार्थ्यांना मिळालेले एकूण गुण १९२२ आणि त्याचे शेकडा प्रमाण = ९.१० %
- याच विद्यार्थ्यांची उत्तर चाचणी घेतली असता या चाचणीत विद्यार्थ्यांना मिळालेले एकूण गुण १३३१० आणि त्याचे शेकडा प्रमाण = ६३.०२ %
- इयत्ता दुसरी पूर्व चाचणी व उत्तर चाचणीतील शेकडा प्रमाणाचा फरक = ५३.९२ %




इयत्ता पहिली पूर्व व उत्तरचाचणीतील केंद्रनिहाय शेकडा प्रमाणातील फरक दर्शवणारा आलेख




इयत्ता दुसरी पूर्व व उत्तरचाचणीतील केंद्रनिहाय शेकडा प्रमाणातील फरक दर्शवणारा आलेख




पूर्व व उत्तरचाचणीच्या निकालातील शेकडा प्रमाणातील फरक दर्शवणारा आलेख

## (६) नवोपक्रमाची यशस्विता / फलनिष्पत्ती ( उद्दिष्टानुसार )

नवोपक्रम कर्त्याने निश्चित केलेली उद्दिष्टे पूर्व चाचणी व उत्तर चाचणीतील शेकडा प्रमाणाच्या ( इयत्ता पहिली ५३.७९ % इयत्ता दुसरी ५३.९२% ) फरकावरून कितपत साध्य केली आहेत हे लगेच आपल्या लक्षात येते. यावरून नावोपक्रमाची यशस्वीता / फलनिष्पत्ती ( उद्दिष्टानुसार ) खालीलप्रमाणे.

१) शाळेपासून दुरावलेले विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहात आले.

२) प्रत्येक गावामध्ये सकारात्मक शैक्षणिक वातावरण निर्माण झाले.

३) फळा तिथे शाळा या उपक्रमामुळे गावकऱ्यांचा शैक्षणिक सहभाग वाढला.

४) विद्यार्थ्यांचा पुन्हा अभ्यासाकडे कल वाढला.

५) विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययनाची सवय लागली.

६) इयत्ता पहिली आणि दुसरीतील विद्यार्थी लेखन व वाचन करू लागले.

७) कोविडच्या परिस्थितीतही विद्यार्थी शिकू शकतो असा आत्मविश्वास शिक्षकांमध्ये निर्माण झाला.

८) खाजगी शाळा बंद असल्याने फळा तिथे शाळा या उपक्रमामुळे जिल्हा परिषद शाळेत खाजगी शाळेतील विद्यार्थी दाखल झाले.

९) मोबाईल इंटरनेट या सोयी ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात उपलब्ध नसल्याने शिक्षणापासून वंचित राहिलेले विद्यार्थी पुन्हा आनंदाने शिकू लागले.

१०) शाळा बंद असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची पालकांमधील भीती नाहीशी झाली.

## (७) समारोप :-

उपक्रम सुरु असतांना प्रत्येक वर्गभेट करून उपक्रमांचे निरीक्षण केले असता समाधान देणाऱ्या बाबी दिसून आल्या. सदर उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांची भरपूर उपस्थिती होती. विद्यार्थी कोविड नियमांचे पालन करत होते म्हणजेच कोविड १९ बद्दल विद्यार्थ्यामध्ये जागृती निर्माण झाली होती. लिहिणे वाचणे विसरलेले विद्यार्थी पुन्हा लिहायला व वाचायला लागली. शिक्षकांमध्ये व पालकांमध्ये समाधान दिसून आले.या उपक्रमाबद्दल अनेक पालकांनी गौरवोद्गार काढली,काहींनी तर फोन करून उपक्रमाची स्तुती केली. देऊळगावराजा येथे झालेल्या अधिकाऱ्यांच्या संयुक्त सभेमध्ये पालकमंत्री महोदयांनी सदर उपक्रमाची स्तुती केली. शेजारच्या तालुक्यांनी सुद्धा असा उपक्रम राबवून ग्रामीन भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात ठेवावे अशा सूचना दिल्या.

सुरवातीला शिक्षणापासून दूर दूर जाणारे विद्यार्थी उपक्रमामुळे शिकू लागले, लेखन व वाचन करू लागले. ज्या विद्यार्थ्यांनी आपले शिक्षक पाहिलेले नव्हते, ज्यांनी आपल्या वर्गाची पुस्तके कशी वाचावीत हे अनुभवले नव्हते असे सर्व इयत्ता पहिली व दुसरीतील विद्यार्थी मुळाक्षरे, अंक वाचन व लेखन करू लागले. शिक्षणाच्या प्रवाहात रमू लागले. अर्थातच गुणवत्ता विकासासाठी “फळा तिथे शाळा” हा उपक्रम उपयोगी ठरला.

## (८) संदर्भसूची व परिशिष्ट :-

❖ संदर्भसूची :-

१) दिशा नवोपक्रमाची, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे, जून २००५

२) शैक्षणिक नवोपक्रम, सिद्धाराम माशाळे, अभिषेक प्रकाशन सोलापूर, जानेवारी २०११

३) दिशा नवोपक्रमांच्या , महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे, मार्च २०१४

४) ध्यास गुणवत्तेचा शोध नवोपक्रमशिलतेचा, श्यामकांत रुले, प्रशांत पब्लिकेशन्स, २०१६

५) जीवन शिक्षण, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे, मे २०१६

❖ **परिशिष्टे** :- परिशिष्ट ( अ ) :- पंचायत समिती देऊळगावराजा मधील जिल्हा परिषदेच्या शाळांची केंद्रनिहाय यादी

| केंद्र / अक्र | मेहुणा राजा | देऊळगाव मही | असोला जहागिर | सरंबा | अंढेरा | भिवगाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | किन्ही पवार | टाकरखेड | गोंधनखेड | टाकरखेड वायाळ | शिवनी आरमाल | जुमडा |
| २ | पिंपळगाव ची | मंडपगाव317 | उंबरखेड | डोध्रा | सेवानगर | तुळजापूर |
| ३ | गारगुंडी | चिंचखेड पश्चिम | पळसखेड झाल्ता | वाकीखुर्द | पाडळी शिंदे | गिरोली खुर्द |
| ४ | खल्याळ गव्हाण | देऊळगाव मही-उर्दू | बामखेड | नारायणगाव | अंढेरा | निमखेड |
| ५ | कमलनाथ | सांवगी टेकाळे | जवळखेड | वाकी बु | बायगाव बु | सावखेड भोई |
| ६ | दगडवाडी | सुलतानपूर | बोरखेडीबावरा | सरंबा | मेंडगाव | गोळेगाव |
| ७ | पांगरी | मंडपगाव फाटा | पिंपळगाव बु | दिग्रस बु | सावखेड भोई | भिवगाव |
| ८ | डोईफोडे वाडी | चिंचखेड पूर्व | पळसखेड मलगदेव | दिग्रस खु | पारधीवाडी | कुंभारी |
| ९ | सीनगाव जहा | निमगाव गुरु | जांभोरा | सुरा | पिंपरीआंधळे | गिरोली बु |
| १० | मेहुनाराजा | देऊळगाव मही 01 | रोहिदासवाडी | धोत्रा नंदइ | अंढेरा | अंभोरा |
| ११ | वाणेगाव | देऊळगाव मही०२ | असोला जहा | दिग्रस उर्दू | | |
| १२ | दगडवाडी | बायगाव खु | चिंचोलीबुरकुल | | | |
| १३ | आळंद | गारखेड | | | | |
| १४ | रोहना | नारायणखेड | | | | |



## परिशिष्ट ( ब ) :- पूर्व चाचणी

इयत्ता पहिली / दुसरी ( फळा तिथे शाळा उपक्रम पूर्वचाचणी ) गुण- २०

विद्यार्थ्याचे नाव :-------------------------------------------- मिळालेले गुण ----------

शाळेचे नाव :------------------------------------------------ पं. स देऊळगाव राजा, जि. बुलडाणा

प्रश्न क्र १- चित्र ओळखून चित्राच्या नावाची जोडी जुळव गुण ५

| | |
|---|---|
|  | माकड |
|  | इमारत |
|  | पतंग |
|  | ससा |
|  | गाय |

प्रश्न क्र २- दिलेल्या मुळाक्षरासारख्या मुळाक्षराला गोल कर गुण ५

ट- पाट नाटक वाट टपाल





ठ - ठसा ठेका ठोका ठेला

ड - डमरू डबा डमडम डाग

ढ - ढग ढवळा गाढव चढ

ण - बाण सण पाणी गाणी

प्रश्न क्र ३- चित्रातील वस्तू मोज आणि समोरील संख्येशी जोडी जुळव गुण ५

| | |
|---|---|
|  | ७ |
|  | ४ |
|  | ३ |
|  | ८ |
|  | ६ |

प्रश्न क्र ४- दिलेल्या संख्येच्या नावासमोर संख्या अंकात लिह गुण ३

| | |
|---|---|
| अकरा | |
| नव्वद | |
| पंचावन्न | |

प्रश्न क्र ५- रिकाम्या चौकटी पूर्ण कर गुण २

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७१ | ७२ | ७३ | | ७५ | ७६ | | ७८ | ७९ | ८० |



## परिशिष्ट ( क ) :- उत्तर चाचणी

इयत्ता पहिली / दुसरी ( फळा तिथे शाळा उपक्रम उत्तरचाचणी ) गुण- २०

विद्यार्थ्याचे नाव :-------------------------------------------- मिळालेले गुण ----------

शाळेचे नाव :----------------------------------------------- पं. स देऊळगाव राजा, जि. बुलडाणा

प्रश्न क्र १- चित्र ओळखून चित्राच्या नावाची जोडी जुळव गुण ५

| | |
|---|---|
|  | घोडा |
|  | सायकल |
|  | विमान |
|  | मासा |
|  | कासव |

प्रश्न क्र २- दिलेल्या मुळाक्षरासारख्या मुळाक्षराला गोल कर गुण ५

य - पाय नायक गाय साय





न - सन नस मन नरम

म - मगर मदन डमडम घाम

प - पळ पतंग पर पटकन

क - कमान करवत कमळ फरक

प्रश्न क्र ३- चित्रातील वस्तू मोज आणि समोरील संख्येशी जोडी जुळव गुण ५

| | |
|---|---|
|  | ८ |
|  | ५ |
|  | ४ |
|  | ३ |
|  | ९ |

प्रश्न क्र ४- दिलेल्या संख्येच्या नावासमोर संख्या अंकात लिह गुण ३

| | |
|---|---|
| सतरा | |
| पंचेचाळीस | |
| साठ | |

प्रश्न क्र ५- रिकाम्या चौकटी पूर्ण कर गुण २

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९१ | ९२ | | ९४ | ९५ | | ९७ | ९८ | ९९ | १०० |

## परिशिष्ट ( ड ) :- पूर्व चाचणी गुण तक्ता

इयत्ता पहिली / दुसरी    फळा तिथे शाळा उपक्रम    पूर्वचाचणी निकाल

शाळेचे नाव :-------------------------------------- पं. स देऊळगाव राजा, जि. बुलडाणा

| अ क्र | विद्यार्थ्याचे नाव | प्रश्न क्र १ मिळालेले गुण ५ पैकी | प्रश्न क्र २ मिळालेले गुण ५ पैकी | प्रश्न क्र ३ मिळालेले गुण ५ पैकी | प्रश्न क्र ४ मिळालेले गुण ३ पैकी | प्रश्न क्र ५ मिळालेले गुण २ पैकी | मिळालेले एकूण गुण २० पैकी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | सर्व विद्यार्थ्यांचे एकूण गुण → | | | | | | |

वर्गशिक्षक स्वाक्षरी    मुख्याध्यापक स्वाक्षरी

## परिशिष्ट ( इ ) :-   उत्तर चाचणी गुण तक्ता

इयत्ता पहिली / दुसरी     <u>फळा तिथे शाळा उपक्रम</u>     उत्तरचाचणी निकाल

**शाळेचे नाव :-------------------------------------- पं. स देऊळगाव राजा, जि. बुलडाणा**

| अ क्र | विद्यार्थ्याचे नाव | प्रश्न क्र १ मिळालेले गुण ५ पैकी | प्रश्न क्र २ मिळालेले गुण ५ पैकी | प्रश्न क्र ३ मिळालेले गुण ५ पैकी | प्रश्न क्र ४ मिळालेले गुण ३ पैकी | प्रश्न क्र ५ मिळालेले गुण २ पैकी | मिळालेले एकूण गुण २० पैकी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | सर्व विद्यार्थ्यांचे एकूण गुण → | | | | | | |

वर्गशिक्षक स्वाक्षरी          मुख्याध्यापक स्वाक्षरी

परिशिष्ट ( इ ) :- उपक्रमातील निवडक फोटो















नवोपक्रमा संदर्भातील video लिंक https://youtu.be/L6c4DFtnEzA

******* ThankYou *******